वाचले :- १) पर्यावरण विभाग, महाराष्ट्र शासन, मंत्रालय मुंबई यांचेकडील शासन निर्णय क्रमांक ध्वनी प्र.२००९/प्र.कं.१२/०८/तां.क.-१, दि.२२/०८/२०१७

२) पोलीस उप अधीक्षक (गृह) पालघर यांचेकडील पत्र क्र. जिविशा/टे-८/ध्वनीक्षेपक सुट/२०१९-१८७ दि.१०/०१/२०१९

क्र.गृह/का.१/टे.३/ध्वनी प्रदुषण सूट/कावि.-२१९/१९
जिल्हाधिकारी कार्यालय, पालघर
दि. १९/०३/२०१९

**आ दे श :-**

ज्याअर्थी उपोद्घातातील अ.क्र.१ अन्वये पर्यावरण विभाग, महाराष्ट्र शासन यांनी दिलेल्या शासन निर्णयातील नमुद तरतुदीनुसार केंद्र शासनाच्या दि.१०/०८/२०१७ रोजीच्या ध्वनी प्रदुषण (नियमन व नियंत्रण) सुधारीत नियम २०१७ च्या नियम ५ उपनियम (३) व त्यासोबत दिलेल्या स्पष्टीकरणात्मक टिप्पणीनुसार ध्वनीक्षेपक व ध्वनीवर्धक इत्यादींच्या वापराबाबत श्रोतगृहे, सभागृहे, सामुहिक सभागृहे आणि मेजवानी कक्ष यासारख्या बंद जागांखेरीज इतर ठिकाणी जिल्हयाच्या निकडीनुसार वर्षामध्ये १५ दिवस निश्चित करून सकाळी ६ वाजल्यापासून ते रात्री १२ वाजेपर्यंत सूट जाहिर करण्याकरीता संबंधीत जिल्हयाचे जिल्हाधिकारी यांना राज्य शासनाव्दारे प्राधिकृत करण्यात आले आहे.

आणि ज्याअर्थी उपोद्घातातील अ.क्र.२ अन्वये पोलीस उप अधीक्षक (गृह) पालघर यांनी कळविले आहे की, सन २०१९ वर्षासाठी पालघर जिल्हयाच्या निकडीनुसार ०१ जानेवारी ते ३१ डिसेंबर या कालावधीमध्ये खालील विवरणातील उत्सवाचे वेळी १५ दिवसांकरीता ध्वनीची विहीत मर्यादा राखून ध्वनीवर्धक व ध्वनीक्षेपक वापरण्याकरीता सकाळी ०६ वाजलेपासून रात्री.१२.०० वाजेपर्यंत सूट देता येईल, असे कळविले आहे.

त्याअर्थी मी, **डॉ.प्रशांत नारनवरे, जिल्हाधिकारी पालघर** उपोद्घातातील अ.क्र.१ अन्वये पर्यावरण विभाग, महाराष्ट्र शासन यांनी दिलेल्या निर्देशान्वये व पोलीस उप अधीक्षक (गृह) पालघर यांनी शिफारस केलेल्या खालील विवरणपत्रातील नमूद दिवसांकरीता ध्वनीवर्धक व ध्वनीक्षेपक वापरण्याकरीता सकाळी ०६.०० वाजल्यापासून रात्री १२.०० वाजेपर्यंत सूट जाहिर करीत आहे. तसेच उपोद्घातातील अनु.क्र.१ मधील अधिसूचनेत घालून दिलेल्या ध्वनी मर्यादेचे व तरतुदींचे उल्लंघन होणार नाही याची दक्षता घ्यावी. त्याचप्रमाणे मा.उच्च न्यायालयाचे वेळोवेळी ध्वनी प्रदुषणासंबंधात दिलेल्या आदेशात नमूद बाबींचे तंतोतंत पालन करावे व न्यायालयाच्या आदेशाचे उल्लंघन होणार नाही याची काळजी घेण्यात यावी.

| अ.क्र. | सण/उत्सव | दिनांक | वार |
|---|---|---|---|
| १ | शिवजयंती (तारखेप्रमाणे) | १९/०२/२०१९ | मंगळवार |
| २ | डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती | १४/०४/२०१९ | रविवार |
| ३ | गणपती उत्सव - दुसरा दिवस | ०३/०९/२०१९ | मंगळवार |
| ४ | गणपती उत्सव - पाचवा दिवस | ०६/०९/२०१९ | शुक्रवार |
| ५ | गणपती उत्सव - गौरी विसर्जन | ०७/०९/२०१९ | शनिवार |
| ६ | गणपती उत्सव - अनंत चतुर्दशी | १२/०९/२०१९ | गुरुवार |
| ७ | नवरात्री उत्सव - अष्टमी | ०६/१०/२०१९ | रविवार |
| ८ | नवरात्री उत्सव - नवमी | ०७/१०/२०१९ | सोमवार |
| ९ | दिवाळी सण - धनत्रयोदशी | २५/१०/२०१९ | शुक्रवार |
| १० | दिवाळी सण - लक्ष्मीपुजन | २७/१०/२०१९ | रविवार |
| ११ | ईद - ए - मिलाद | १०/११/२०१९ | रविवार |
| १२ | ख्रिसमस | २५/१२/२०१९ | बुधवार |
| १३ | ३१ डिसेंबर | ३१/१२/२०१९ | मंगळवार |

सदरचा आदेश आज दिनांक १९/०३/२०१९ रोजी माझ्या सही व शिक्क्यानिशी दिला आहे.

सही/-xxx
(डॉ.प्रशांत नारनवरे)
जिल्हाधिकारी पालघर

Scanned by CamScanner

प्रत :-

१) मा. अपर मुख्य सचिव, पर्यावरण विभाग मंत्रालय, मुंबई यांना माहितीस्तव सविनय सादर.

२) मा. विभागीय आयुक्त, कोंकण विभाग, कोंकण भवन, नवी मुंबई यांना माहितीस्तव सविनय सादर.

३) आयुक्त, वसई विरार शहर महानगरपालिका, विरार यांना माहितीस्तव अग्रेषित.

४) मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद पालघर यांना माहितीस्तव अग्रेषित.

५) पोलीस अधीक्षक पालघर

२/- सदर आदेशाच्या अनुषंगाने योग्य ती कार्यवाही आपल्या स्तरावरून करण्यात यावी.

६) जिल्हा सूचना माहिती अधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, पालघर

२/- सदर आदेशास संकेत स्थळावर प्रसिध्दी देण्यात यावी व केलेल्या कार्यवाहीबाबतचा अहवाल संबंधीत संकलनास सादर करण्यात यावा.

७) जिल्हा माहिती अधिकारी, पालघर

२/- सदर आदेशास आपल्या स्तरावरून व्यापक प्रसिध्दी देण्यात यावी व वृत्तपत्रात प्रसिध्द करण्यात आलेल्या कात्रणाच्या प्रती या कार्यालयास सादर करण्यात यावेत.

८) उपविभागीय दंडाधिकारी (सर्व पालघर जिल्हयातील) यांना माहिती तथा पुढील कार्यवाहीस्तव.

९) कार्यकारी दंडाधिकारी (सर्व पालघर जिल्हयातील) यांना माहिती तथा पुढील कार्यवाहीस्तव.

जिल्हाधिकारी पालघर

Scanned by CamScanner